**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**
**३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५**

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

जा. क्र. NDKSP-१४०२७(३९)/२/२०२५-१४ दि. २४ / ०९ /२०२६

**विभागीय कृषि सहसंचालक,**
**(छत्रपती संभाजीनगर, अमरावती, लातूर, नागपूर, नाशिक)**

**विषय:- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत गांडूळ खत व नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट बाबत.**

**संदर्भ:-** १) प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. NDKSP-२२०१९ (२१)/१६/२०२५-DBT, दि. २८.१०.२०२५
२) शासन निर्णय क्र.मग्रारो- २०१६/प्र.क्र.८५/ मग्रारो-१,दि. ०१ ऑक्टोबर,२०१६

उपरोक्त विषयान्वये, प्रकल्पांतर्गत गांडूळ खत व नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट घटकासाठी मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र. १ अन्वये यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीदरम्यान गांडूळखत उत्पादन युनिट (टाकीचे बांधकाम) तसेच नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिटबाबत क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून त्यानुषंगाने नमुना अंदाजपत्रक (खर्चाचे विवरणपत्र) खालीलप्रमाणे सहपत्रित करून देण्यात येत आहेत, यानुसार क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करण्यात यावी .

गांडूळखत उत्पादन युनिट (टाकीचे बांधकाम) तसेच नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिटच्या बांधकामासाठी अनुक्रमे रु. ११,५२०/- व रु. १०,७४६/- इतके अर्थसहाय्य, मग्रारोहयो शासन निर्णय दिनांक ०१.१०.२०१६ (संदर्भ क्र. २) मध्ये नमूद केलेल्या मापदंडानुसार अनुज्ञेय राहील.

Digitally signed by
Minal Karanwal
Date: 28-09-2026
14:39:49

**( मिनल करणवाल )**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

**प्रत:-**
१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी प्रकल्पातील) सर्व यांना ( माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
२. उपविभागीय कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व ) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

## गांडूळ खत उत्पादन युनिट (टाकीचे बांधकाम)

| अ. क्र. | बाब | परिमाण | दर रु. | मनुष्य दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | कडी कचरा गोळा करणे व ढीग लावणे | १ | ३१७ | १० | ३१७० |
| २ | स्वत:कडील साहित्य वापरून सावलीसाठी  कच्चे शेड तयार करणे | १ | ३१७ | ८ | २५३६ |
| ३ | टाकी भरणे, व्यवस्थापन पाणी मारणे व काढणी करणे ( ३.६ मी. X १ मी. X ०.७५ मी) / (४.० मी. X १.१५ मी. X ०.६० मी) | १ | ३१७ | १५ | ४७५५ |
| ४ | आवश्यक गांडूळ | २ | ४००/ प्रति किलो | - | ८०० |
| ५ | टाकीचे बांधकाम | १ | ५००० | | ५००० |
| ६ | शेणाचा वापर (स्वत: कडील) | ० | - | - | - |
| | **एकूण** | | | | **१६,२६१** |
| | **महत्तम देय  अनुदान** | | | | **११,५२०** |

## नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट

| अ. क्र. | बाब | परिमाण | दर रु. | मनुष्य दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | काडी कचरा गोळा करणे व ढीग लावणे | १ | ३१७ | १० | ३१७० |
| २. | टाकी भरणे, व्यवस्थापन,पाणी मारणे  व काढणी करणे | १ | ३१७ | १५ | ४७५५ |
| ३ | टाकीचे वीट बांधकाम ३.६० मीटर  x १.५०  मीटर x ०.९० मीटर आकाराचे ९ इंच जाडीची भिंत बांधकाम साहित्य व कुशल मजूरीसह` | १ | ६००० | ० | ६००० |
| ४. | शेणाचा वापर (स्वत: कडील) | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | | | | **१३,९२५** |
| | **महत्तम  देय अनुदान** | | | | **१०,७४६** |